18 JAN 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ परिक्षेत्रात स्कूल कनेक्ट अभियान यशस्वी करा

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अंमलबजावणीमुळे होणाऱ्या विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलांबाबत विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने स्कूल कनेक्ट (एन.ई.पी. कनेक्ट) संपर्क अभियान शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात यशस्वी करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. महाराष्ट्र शासनाने राज्यातील महाविद्यालयांमधील स्थूल



नोंदणी प्रमाण वाढविण्यासाठी व राज्यात राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० यामुळे होणाऱ्या शैक्षणिक बदलांबाबत व त्यांच्या सकारात्मक परिणामांची माहिती देण्यासाठी स्कूल कनेक्ट (एनईपी कनेक्ट) संपर्क अभियान सर्व अकृषी विद्यापीठ स्तरावर १५ ते ३१ जानेवारी या कालावधीत राबविण्याबाबत कळविले आहे. त्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे संलग्नित महाविद्यालयांच्या समन्वयकांसाठी स्कूल कनेक्ट अभियानविषयक प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्या कार्यशाळेत अध्यक्षस्थानावरुन कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पुढील शैक्षणिक वर्षापासून अकृषि विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षासाठी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षासाठी होणार आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, नूतन शैक्षणिक धोरणामध्ये पारंपरिक शिक्षण पद्धतीच्या तुलनेत आमूलाग्र बदल करण्यात आलेले आहेत. ते विद्यार्थ्यांपर्यंत, त्यांच्या पालकांपर्यंत वेळेत पोहोचविणे गरजेचे आहे.

यावेळी डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी मार्गदर्शन केले. उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

18 JAN 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरणासाठी कॉन्झर्वेशन फौंडेशनचे कार्य अनुकरणीय : कुलगुरू डॉ. शिर्के

## 'शाश्वत उर्जा स्त्रोत 'सीड पेपर दिनदर्शिकेचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दि कॉन्झर्वेशन फौंडेशन ऑफ इंडियातर्फे पुर्नप्रक्रिया केलेल्या कागदापासून तयार केलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. गेले काही वर्षे फौंडेशनतर्फे अशा सीड पेपर दिनदर्शिका प्रकाशित करण्यात येत आहेत. दिनदर्शिकेच्या कागदात विविध वनस्पतींच्या उच्च उगवण क्षमता असणाऱ्या फुले, भाजीपाला व औषधी वनस्पतींच्या बीया समाविष्ट केल्या आहेत.



**कोल्हापूर : दिनदर्शिकेचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत अमरदीप पाटील, अशिष घेवडे आदी.**


दर दोन महिन्यांसाठी अशी सहा पाने आहेत. प्रत्येक वर्षी वेगळी संकल्पना मांडण्यात येते. या वर्षी 'शाश्वत उर्जा स्त्रोत' हा विषय घेण्यात आला असून, पवन उर्जा, सौर उर्जा, जल उर्जा, जैव उर्जा, समुद्र उर्जा व अणु उर्जा यांचा समावेश करण्यात आलेला आहे. महिने संपतील त्याप्रमाणे तो कागद रात्रभर पाण्यात भिजवून जमिनीत रोपण केल्यास त्यातील बियांपासून विविध वनस्पती उगवतात.

कुलगुरू डॉ. डी. टि. शिर्के म्हणाले, विविध शाश्वत उर्जेचा विषय घेवून यातुन जनजागृती करण्याच्या उद्देशाचे कौतुक केले. भविष्यात पुनःप्रक्रिया केलेल्या कागदाचा वापर जास्तीत जास्त करण्यात यावा.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, पुनःप्रक्रियेपासून बनवलेल्या कागदामुळे बरीचशी वृक्षतोड थांबेल. सीड पेपरमुळे वृक्ष संपदा वाढणार आहे. फौंडेशनचे अध्यक्ष आशिष घेवडे यांनी स्वागत करून, या संकल्पनेविषयी माहिती दिली.

यावेळेस शाश्वत उर्जा हा विषय आदिश अमरदीप पाटील यांनी आपल्या अभिनव कलाकारीतुन रेखाटला आहे. आदिशचे कौतुक उपस्थित जगविख्यात चित्रकार भास्कर हांडे यांनी केले. सदर प्रसंगी ॲडफाईनचे अमरदीप पाटिल, आमीर शेख, चैतन्य पोतदार, सौरभ दबडे, मितेष घेवडे आदी उपस्थित होते. डॉ. अंजली पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2024
तरूण भारत



कोल्हापूर : शिवशाहीर राजू राऊत यांचे राज्य सांस्कृतिक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठातर्फे ग्रंथभेट देऊन अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर व सौ. राऊत.

# राज्य सांस्कृतिक पुरस्काराबद्दल शाहीर राऊत यांचा सत्कार

■ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी निवासस्थानी सदिच्छा भेट देवून केला सन्मान

कोल्हापूर : शिवशाहीर पुरूषोत्तम उर्फ राजू राऊत यांना महाराष्ट्र शासनाकडून शाहिरीसाठीचा सांस्कृतिक पुरस्कार जाहीर होणे, कलावंताचा सन्मान आहे. ही समस्त कोल्हापूरकरांसाठी अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी निवास्थानी जावून शाहीर राऊत यांचा सन्मान केला. शिवाजी विद्यापीठ परिवारातर्फे शाहू चरित्र ग्रंथ भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले की, राजू राऊत हे केवळ शाहीर नाहीत, तर चित्रकला, शिल्पकला, फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी, दुर्मिळ वारशांचे संग्राहक आणि अभ्यासक अशा कलागुणांनी समृद्ध असे त्यांचे व्यक्तीमत्त्व आहे. कोल्हापूरच्या शाहिरी परंपरेचा तर हा सन्मान आहेच, पण त्याचबरोबर हरहुन्नरी, अष्टपैलू कलावंतांची खाण असलेल्या करवीरभूमीचाही गौरव आहे. त्यांचा विद्यापीठ परिवारासह समस्त करवीरवासियांना अभिमान आहे. या पुढेही त्यांच्या हातून अशीच सेवा घडत राहावी. त्यासाठी त्यांना दीर्घायुरारोग्य लाभावे, अशा शुभकामनाही कुलगुरूंनी व्यक्त केल्या. सुमारे तासभराच्या या भेटीमध्ये शाहीर राऊत यांनी त्यांच्या कलात्मक प्रयोगशीलतेचे काही भारावून टाकणारे नमुने सादर केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह राऊत परिवारातील सदस्यही उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
18 JAN 2024 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्री शिक्षणाने नव्या युगाची पहाट

## डॉ. व्ही. एन. शिंदे : ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १७ : महाराष्ट्र खऱ्या अर्थाने स्त्री शिक्षणाचे माहेरघर आहे. महात्मा फुले यांच्यापासून रोवलेली स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ आजच्या युगासाठी स्त्री शिक्षणाची नवी पहाट म्हणावी लागेल, असे स्पष्ट मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले. ताराराणी विद्यापीठामध्ये डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त झालेल्या व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील होते. सागर वातकर यांना यावेळी ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला.



**कोल्हापूर :** ताराराणी विद्यापीठातर्फे डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त झालेल्या व्याख्यानात बोलताना डॉ. व्ही. एन. शिंदे. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील.

डॉ. शिंदे म्हणाले, 'डॉ. व्ही. टी. पाटील यांनी शाहू, फुले, आंबेडकर यांचा शैक्षणिक वारसा व सामाजिक कार्याची परंपरा अखंडित ठेवली. ताराराणी विद्यापीठ व मौनी विद्यापीठ या दोन शैक्षणिक संस्था उभारून स्त्री शिक्षण व ग्रामीण शिक्षण बहुजन समाजासाठी त्यांनी उपलब्ध करून दिले. संस्थेचे विश्वस्त डॉ. सी. आर. गोडसे, जे. एस. पाटील, डॉ. भारती शेळके, आदी उपस्थित होते.

डॉ. सुजय पाटील यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे सचिव प्राजक्त पाटील यांनी मानपत्राचे वाचन केले. पी. आर. मंडलिक यांनी सूत्रसंचालन केले. तर एस. डी. चव्हाण यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 JAN 2024 पुढारी

# मराठा इतिहासात मोडी लिपीचे विशेष महत्त्व

## डॉ. अवनीश पाटील : 'मोडी लिपी प्रचार व प्रसार' विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मराठा इतिहासाच्या संशोधनामध्ये मोडी लिपीच्या अभ्यासाचे विशेष महत्त्व आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी व्यक्त केले.

शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त इतिहास अधिविभाग, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने मोडी लिपी प्रचार व प्रसार या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते.

यावेळी डॉ. अवनीश पाटील म्हणाले, मध्ययुगीन काळातील मराठा इतिहासाच्या संशोधनासाठी मोडी लिपीचे ज्ञान आवश्यक आहे. मराठा इतिहासाच्या मोडी लिपीतील साधने संपूर्ण भारतातील अभिलेखागार त्याबरोबर लंडन, पॅरिस, स्पेन, हॉलंड येथील संग्रहालयातील मोठ्या प्रमाणात मोडी कागदपत्रांचा संग्रह आहे. इतिहास अभ्यासकांनी या संग्रहालयातील मोडी कागदपत्रांचा अभ्यास करून संशोधन करावे, असे आवाहन केले. अमोल महल्ले यांनी अक्षर ओळख करून दिली. गणेश खोडके यांनी अभिलेखागारातील मोडी कागदपत्रांचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी मोडीचे ज्ञान प्राप्त करून नव संशोधकांनी मराठा इतिहासात जास्तीत जास्त संशोधन करावे, असे आवाहन केले.




**कोल्हापूर : मोडी लिपी कार्यशाळेत बोलताना डॉ. अवनीश पाटील. सोबत डॉ. दत्तात्रय मचाले, अमोल महल्ले, गणेश खडके. (छाया : पप्पू अत्तार)**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2024
सकाळ

# 'मोडी कागदपत्रांच्या अभ्यासातून अधिकाधिक संशोधन करा'

कोल्हापूर, ता. १७ : 'मराठा इतिहासाच्या मोडी लिपीतील साधने संपूर्ण भारतातील अभिलेखागारामध्ये आहेत. लंडन, पॅरिस, स्पेन, हॉलंड येथील संग्रहालयात मोठ्या प्रमाणात मोडी कागदपत्रांचा संग्रह आहे. इतिहास अभ्यासकांनी या संग्रहालयातील मोडी कागदपत्रांचा अभ्यास करून अधिकाधिक संशोधन करावे', असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभाग, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र, राज्य शासनाच्या पुराभिलेख संचालनालयातर्फे आयोजित 'मोडी लिपी प्रचार व प्रसार' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी प्रास्ताविक केले.

अमोल महल्ले यांनी मोडी लिपीच्या अक्षर वळण बाराखडीचे प्रशिक्षण आणि अक्षर ओळख करून दिली. गणेश खोडके यांनी विविध कालगणना, रेघी हिशेबाची पद्धत, जमीन मोजण्याची पद्धत, अभिलेखागारातील मोडी कागदपत्रांचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी मोडीचे ज्ञान प्राप्त करून नव संशोधकांनी मराठा इतिहासात जास्तीत जास्त संशोधन करावे, असे आवाहन केले.

जनसंपर्क कक्ष
18 JAN 2024 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : राज्यस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेतील शिवाजी विद्यापीठाच्या विजयी संघासमवेत डॉ. पी. टी. गायकवाड. सोबत डॉ. पकंज पवार, डॉ. कविता गजरे आदी.

# आविष्कार संशोधन स्पर्धेत विद्यापीठ संघाचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने प्रावीण्य मिळवत सुंदरवल प्युअर सायन्स फिरता चषक मिळवला आहे.

राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ आविष्कार संशोधन स्पर्धा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे झाल्या. आविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा ५० सदस्यांचा



संघ सहभागी झाला होता. पदवी, पदव्युत्तर व पदव्युत्तर पदवी स्तरातून सहा शाखांमधून ४५ विद्यार्थ्यांनी प्रावीण्य मिळवले. विद्यापीठ संघाने चांगल्या प्रकारे संशोधन प्रकल्प सादर करून यश मिळवले. प्रथमच विद्यापीठास प्युअर सायन्स कॅटेगरीमध्ये सर्वसाधरण विजेतपद मिळाले. संघव्यवस्थापक म्हणून डॉ. सिद्धेश्वर जाधव, सांगली, डॉ. कविता गजरे, कोल्हापूर, आविष्कार समन्वयक डॉ. पंकज पवार, डॉ. पी. टी. गायकवाड यांचा समावेश होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाला विज्ञान श्रेणीत सर्वसाधारण विजेतेपद

कोल्हापूर : नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ येथे झालेल्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ आविष्कार संशोधन स्पर्धेत विज्ञान श्रेणीत शिवाजी विद्यापीठाने प्रथमच सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले.

नाशिक येथे १२ ते १५ जानेवारी या कालावधीत स्पर्धा झाली. मानव्यशास्त्र शाखा, वाणिज्य व्यवस्थापन व विधी शाखा, विज्ञान व तंत्रज्ञान शाखा, मेडिसिन व फॉर्मसी शाखा, शेती व पशुसंवर्धन शाखा, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखांमधून ४५ विद्यार्थ्यांनी यश मिळवले. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. सिद्धेश्वर जाधव, डॉ. कविता गजरे, डॉ. पंकज पवार, विजय इंगवले व डॉ. पी. टी. गायकवाड यांचा समावेश आहे. संघास कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2024
पुण्यनगरी

# अविष्कार संशोधनात विद्यापीठ संघाचे प्रावीण्य

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ अविष्कार संशोधन स्पर्धा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे दि. १२ ते १५ जानेवारी कालावधीत आयोजित करण्यात आली होती. सदर अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा एकूण ५० सदस्यांचा संघ सहभागी झाला होता. शिवाजी विद्यापीठास प्रथमच प्युअर सायन्स कॅटेगिरीमध्ये सर्वसाधरण विजेतेपद प्राप्त होवून सुंदरबल प्युअर सायन्स फिरता चषक मिळाला आहे.

यामध्ये पदवी, पदव्युत्तर व पदव्युत्तर पदवी या ३ स्तरातुन विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये, मानव्यशास्त्र शाखा, वाणिज्य व्यवस्थापन व विधी शाखा, विज्ञान व तंत्रज्ञान शाखा, मेडिसीन व फॉर्मसी शाखा, शेती व पशुसंवर्धन शाखा, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखा अशा एकूण ६ शाखांमधून प्रावीण्य मिळवलेले ४५ विद्यार्थी, संघव्यवस्थापक म्हणून डॉ. सिध्देश्वर जाधव, डॉ. कविता गजरे, डॉ. पंकज पवार, विजय इंगवले व डॉ. पी. टी. गायकवाड यांचा समावेश होता. विद्यापीठ संघाने नाशिक येथे संशोधन प्रकल्प सादर करुन यश प्राप्त केले आहे.

विद्यापीठ संघास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. डी. एच. दगडे आदींचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2024
लोकमत

# विद्यापीठात २५ जानेवारीला चर्चासत्राचे आयोजन

कोल्हापूर : भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, राज्यशास्त्र विभाग, गांधी अभ्यास केंद्र व नेहरू अभ्यास केंद्र यांच्यावतीने येत्या २५ जानेवारीला 'भारतीय गणराज्य आणि स्त्रियांचा राजकीय सहभाग' या विषयावर चर्चासत्र आयोजित केले आहे. सकाळी १०:३० ते सायंकाळी ४:३० या वेळेत हे चर्चासत्र होईल. यावेळी पोस्टर प्रदर्शनही आयोजित केले आहे.

चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी शनिवारपर्यंत नोंदणी करता येणार आहे. प्राध्यापक व पीएच.डी. विद्यार्थ्यांसाठी १०० व इतर विद्यार्थ्यांसाठी ५० रुपये नोंदणी शुल्क आहे. यात सहभागी होण्याचे आवाहन शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार, नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी केले आहे.

18 JAN 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




# स्वच्छता मोहिमेतून चार डंपर खरमाती उठाव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डिप क्लिनिंग मोहिमेंतर्गत बुधवारी शहरात रस्त्यावरील स्वच्छतेबरोबरच ४ डंपर खरमाती, तणकट व कचरा उठाव करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसूळ यांच्या मार्गदर्शनासाठी शिवाजी विद्यापीठजवळील के.एस.बी.पी. चौक ते सायबर चौक ते एनसीसी भवन येथे मेन रोडवर मोहीम राबविण्यात आली.

यावेळी फुटपाथ स्वच्छ करून रस्त्याकडेला वाढलेले गवत काढण्यात आले. रस्त्यामधील दुभाजकांची स्वच्छता करून फुटपाथ शेजारील झाडांचे बुंधे रंगवण्यात आले. यावेळी खरमातीबरोबरच चार ट्रॉली तणकट उठाव करण्यात आले. या मोहिमेमध्ये सहा. आयुक्त संजय सरनाईक, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, आरोग्य निरीक्षक सुशांत कांबळे, सुशांत कावडे, श्रीराज होळकर, ऋषिकेश सरनाईक, शिवाजी विद्यापीठ DOT चे ३० विद्यार्थी, स्वच्छता दूत, आरोग्य व विभागीय कार्यालय क्रं.३ कडील १५० कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.



**कोल्हापूर : डिप क्लिनिंग मोहिमेंतर्गत सहभागी अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसूळ व इतर. (छाया : पप्पू अत्तार)**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2024
पुढारी

# नाईट कॉलेजमध्ये डिजिटलरूपी कार्यशाळेचे शनिवारी आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालयांतर्गत न्यू कॉलेज क्लस्टरअंतर्गत नाईट कॉलेज येथे डिजिटलरूपी कार्यशाळा शनिवार (दि. २०) रोजी आयोजित केली आहे. कार्यशाळेत अर्जुननगर कॉलेजचे प्रा. डॉ. संतोषकुमार यादव, बँक अधिकारी सयाजी माने, औंध कॉलेजचे डॉ. सचिन सरदेसाई मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेस विद्यार्थी, प्राध्यापकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

18 JAN 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रत्नाप्पाण्णा कुंभार कॉमर्स कॉलेज विजेता

## विभागीय क्रिकेट (पुरुष) स्पर्धा : २४ संघांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

नानीबाई चिखली ता. १७ : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरअंतर्गत कोल्हापूर विभागीय क्रिकेट (पुरुष) स्पर्धा अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयामध्ये उत्साहात झाल्या. स्पर्धेत कोल्हापूरच्या देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉमर्स कॉलेजने प्रथम क्रमांक पटकावताना प्रतिस्पर्धी महावीर कॉलेजचा ५४ धावांनी पराभव केला. देवचंद महाविद्यालय व तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग कॉलेज, वारणानगर येथील मैदानावर स्पर्धा झाल्या. स्पर्धेत जिल्ह्यातील २४ संघांनी सहभाग घेतला.




देवचंद महाविद्यालय-विभागीय क्रिकेट स्पर्धेत प्रथम क्रमांक विजेत्या कॉमर्स कॉलेजला बक्षीस देताना प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे. यावेळी स्पर्धाप्रमुख डॉ. रवींद्र चव्हाण.

देवचंदच्या प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे यांच्या हस्ते मैदानपूजन करून उद्घाटन झाले. उद्घाटनाच्या सामन्यात विवेकानंद कॉलेज ( कोल्हापूर ) संघाने डॉ. ए. डी. शिंदे इंजिनिअर कॉलेज ( भडगाव ) संघाचा १६८ धावांनी पराभव करीत विजयी सलामी दिली. उपांत्य फेरीतील पहिल्या सामन्यात देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉमर्स कॉलेज कोल्हापूरने देवचंद महाविद्यालयाचा पराभव केला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात महावीर कॉलेजने नाईट कॉलेजचा पराभव केला. यानंतर तृतीय क्रमांकासाठी देवचंद कॉलेज व नाईट कॉलेज ( कोल्हापूर ) यांच्यात झालेल्या लढतीत देवचंद महाविद्यालयाने नाईट कॉलेज संघाचा ६६ धावांनी पराभव केला. अंतिम सामना देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉमर्स कॉलेज व महावीर कॉलेज यांच्यात झाला. कॉमर्स कॉलेजने प्रथम फलंदाजी करताना १३९ धावा केल्या. यामध्ये वैभव पाटीलने ५२ धावांचे योगदान दिले. धावांचा पाठलाग करताना महावीर कॉलेजचा संघ ८५ धावा करू शकला. हा सामना कॉमर्स कॉलेज कोल्हापूरने ५४ धावांनी जिंकून अजिंक्यपद पटकावले.

बक्षीस वितरण प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे, डॉ. पी. डी. शिरगावे यांच्या उपस्थितीत झाले. स्पर्धाप्रमुख डॉ. रवींद्र चव्हाण, नाईट कॉलेजचे प्राचार्य सुरेश फराकटे, प्रा. योगेश पाटील, डॉ. रोहित पाटील उपस्थित होते. पंच म्हणून सुनील खांडके, अभिजित सांडुगडे, महेंद्र सूर्यवंशी, युनूस शिकलगार, आर्यन माने, काशीम शिकलगार यांनी काम पाहिले. सुनील आडवी, अनिल आडवी, विठ्ठल देशमुख, महेश चौगुले, पृथ्वीराज माळी, प्रा. बकस कुरणे यांनी परिश्रम घेतले. निरंजन जाधव यांनी आभार मानले.

### आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड

विभागीय स्पर्धेतील विजेत्या कॉमर्स कॉलेज, महावीर कॉलेज व देवचंद कॉलेज या जिल्ह्यातील तीन संघांची निवड आंतरविभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी झाली. या स्पर्धा सांगलीतील विलिंग्डन कॉलेजच्या मैदानावर २२ जानेवारीपासून होतील. कोल्हापूर व्यतिरिक्त सांगली, सातारा जिल्ह्यातील प्रत्येक तीन क्रमांकाचे विजेते संघ सहभागी होतील. या स्पर्धेतूनच अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठचा १६ सदस्यांचा संघ निवडला जाईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2024
पुण्यनगरी

# नाझ सिद्दीकी वक्तृत्व स्पर्धेत प्रथम



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे मराठी पत्रकारदिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेत नाझ सिद्दीकी हिने प्रथम क्रमांक पटकावला. तर गौतमी शिकलगार आणि राधिका शर्मा यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविला. अध्यासनाच्या इमारतीत ही स्पर्धा झाली. नाईट कॉलेजच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ.अरूण शिंदे आणि सांगली आकाशवाणीचे प्रसारण अधिकारी डॉ. दीपक ठमके यांनी परीक्षण केले. स्पर्धेत पत्रकारिता व जनसंवाद विभाग, एम. ए. मास कम्युनिकेशन विभाग, पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन, ऐतवडे येथील वारणा महाविद्यालय, तिटवे येथील शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय, संजय घोडावत विद्यापीठ आदी संस्थांतील विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रास्ताविक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. सूत्रसंचालन ऋषीकेश पाटील तर आभार साजिद शेख याने मानले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर, जयप्रकाश पाटील, आनंदा पांढरबळे आदी उपस्थित होते.